# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. 'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक सुसंगत प्रशासन आणि प्रभावी प्रशासनाच्या दिशेनं परिवर्तनकारी पाऊल असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

2. प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तसंच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्मभूषण तर 11 मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

3. पंधरावा मतदार दिन राज्यभरात उत्साहात साजरा

4. विश्व मराठी संमेलनात सर्वांनी सहभागी होण्याचं मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचं आवाहन

आणि

5. वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताची इंग्लंडवर विजयी आघाडी

**प्रजासत्ताक दिन**

'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक सुसंगत प्रशासन आणि प्रभावी प्रशासनाच्या दिशेनं परिवर्तनकारी पाऊल असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला संबोधित करताना त्या बोलत होत्या. भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा यांच्या जागी भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा आणण्याचा निर्णय हा या प्रयत्नांपैकी सर्वात उल्लेखनीय आहे असं सांगून त्या म्हणाल्या की, नवीन कायद्यांनी

फौजदारी न्याय व्यवस्थेत शिक्षेऐवजी न्यायाच्या भावनेला केंद्रस्थानी ठेवलं आहे. राष्ट्रपती म्हणाल्या की, गेल्या 75 वर्षांपासून संविधानाने देशाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला आहे. मातृभूमीला परकीय राजवटीच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी बलिदान देणाऱ्या महान वीरांचं त्यांनी स्मरण केलं. धाडसी आणि दूरदर्शी आर्थिक सुधारणांच्या बळावर येत्या काळात देशाच्या प्रगतीची गती कायम राहील, असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला. वित्त क्षेत्रात सरकारद्वारे होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराचं त्यांनी कौतुक केलं. सैनिक, पोलिस आणि निम लष्करी जवानांना शुभेच्छा देत राष्ट्रपतींनी आपल्या भाषणाच्या समारोप केला.

**प्रजासत्ताक दिन**

संपूर्ण देशभरात आज 76 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु नवी दिल्लीतील कर्तव्य पथावर आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या संचलन सोहोळयाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करून होईल. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो हे संचलनाचे प्रमुख पाहुणे असतील. "स्वर्णिम भारत - विरासत और विकास" या संकल्पनेनुसार तयार करण्यात आलेले, 31 चित्ररथ, या सोहोळयात सहभागी होणार आहेत. 47 विमानांच्या विविध कसरतीनी या कार्यक्रमाची सांगता होईल. प्रजासत्ताक दिनाच्या सोहोळयात राष्ट्र आणि समाज उभारणीतील योगदानाचा गौरव करण्यासाठी, देशभरातील हस्तकला आणि हातमाग कारागीर, स्वयंसाह्यता गट सदस्य, आशा आणि अंगणवाडी सेविका अशा 34 श्रेणीतील दहा हजार विशेष अतिथींना यावेळी आमंत्रित करण्यात आलं आहे.

**कोनकर**

यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातल्या स्वयंसाह्यता समूहामधल्या 11 महिला आणि त्यांच्या पतींना आमंत्रित करण्यात आल्याची माहिती रत्नागिरी जिल्हा विपणन व्यवस्थापक अमोल काटकर यांनी आकाशवाणी प्रतिनिधीशी बोलताना दिली. यापैकी चिपळूणमधील कृषी सखी, मनस्वी भडवळकर यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या...

**मी कृषी सखी म्हणून गावात महिलांना परसबाग कशी करायची सेंद्रिय शेती कशी करायची या विषयी मार्गदर्शन करत असते. मी नाचणी पासून विविध उत्पादन तयार करते . मला इथ दिल्लीत येण्याची संधी मिळाली त्या बद्दल मी उमेद चे आभार मानते.**

## राष्ट्रपती पदक

प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्रातल्या 39 पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना गुणवत्तापूर्वक सेवेसाठी आणि 4 पोलीस अधिकाऱ्यांना उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पोलीस पदकं जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये पालघर पोलीस दलात आर्थिक गुन्हे शाशाखेतील पोलीस उप अधीक्षक अनिल लाड, स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उप निरीक्षक रविंद्र वानखेडे, नांदेड पोलीस नियंत्रण कक्षातील सहाय्यक उपनिरीक्षक संजय जोशी आणि हेड कॉन्स्टेबल दिलीप राठोड आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांना राष्ट्रपती पोलिस पदक घोषित करण्यात आलं आहे.

## पद्म- पुरस्कार

देशातील सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातून माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तसेच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्म भूषण तर 11 मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत. कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी सुलेखनकार अच्युत पालव, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, शास्त्रीय गायक अश्विनी भिडे देशपांडे, पार्श्व गायिका जसपिंदर नरुला, ज्येष्ठ बासरी वादक रानेद्र भानू मजुमदार, आणि ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना, व्यापार आणि उद्योग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या अरूंधती भट्टाचार्य यांना तर पर्यावरण आणि वनसंवर्धन करणारे चैत्राम पवार यांना सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी महाराष्ट्राचे अरण्य ऋषी वन्यजीव अभ्यासक मारोती चीतमपल्ली यांना, तर कृषी क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

## मतदार दिन

15 वा राष्ट्रीय मतदार दिन काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. लोकसभा आणि विधानसभा निवडणूक 2024 साठी सर्वांनी उत्कृष्ट कार्य केल्यामुळे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात देशात, राज्याचा गौरव होत आहे, ही आपल्याकरीता अभिमानाची बाब आहे, असं प्रतिपादन राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी काल पुण्यातील राज्यस्तरीय कार्यक्रमात बोलताना केलं. राज्यातील एक लाखाहून अधिक मतदान केंद्रांमध्ये काम करणारे शासकीय यंत्रणेचे सुमारे 16 लाख कर्मचारी सत्कारास पात्र आहेत असंही डॉक्टर कुलकर्णी म्हणाले.

मतदारांमधील उदासिनता कमी करण्याकरीता प्रयत्न करणे गरजेचं आहे यावर  पुणे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी भर दिला.

**राष्ट्रीय मतदार दिन**

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करण्याची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. कोल्हापूर मध्ये जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती तर सांगली इथं अनेक स्पर्धाचं आयोजन करण्यात आलं होतं. हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर इथल्या नारायणराव वाघमारे महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन जनजागृती अभियान राबविण्यात आलं तर कळमनुरी इथं रांगोळीतून मतदान जनजागृती करण्यात आली. 2024 मधील विधानसभा निवडणूकीत सर्वाधिक मतदान केलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील गावांना पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं यामध्ये शिर्डी विधानसभा मतदार संघातील तरसवाडी या गावाला सर्वाधिक 95 टक्के मतदानाबद्दल जिल्हास्तरीय पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**विश्व मराठी संमेलन**

मराठी भाषेची ख्याती विश्वस्तरावर पोहोचवण्यासाठी 30 जानेवारीला पुण्यात होणाऱ्या विश्व मराठी संमेलनात सर्वांचा, विशेषतः पुणेकरांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचं प्रतिपादन मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं.

**हे विश्व संमेलन हे पुणेकरांच आहे आणि पुणेकरांनी हे विश्व संमेलन करत असताना आपल्या सर्वांचा सहभाग हा आमच्या सोबत असावा अशी आम्हाला विनंती करायची आहे. अडीच लाख तुम्ही आणलेली पुस्तक द्यायची आणि त्यातली पुस्तकं घ्यायची हा आदान प्रदानचा कार्यक्रम आहे. शासन म्हणून हे कार्यक्रम होत नाही , तर पुण्यातल्या प्रत्येक मराठी भाषिक व्यक्तीला सोबत घेऊन हे संमेलन करायचे आहे, आणि म्हणून नवीन कल्पना देखील आल्या , जी व्यक्ती रस्त्यावर बसून कित्येक वर्ष पुस्तक विकते, मराठी भाषा लोकांपर्यंत पोहचवते , हा देखील माझ्या दृष्टीने तोडीचा माणूस आहे त्याचा देखील सत्कार झाला पाहिजे हे देखील आपण करतोय पुढच्या पिढीला मराठी भाषा कळावी त्याचं जतन व्हावं संवर्धन व्हावं, हा जो माझ्या विभागाचा उद्देश आहे तो पूर्ण व्हावा तो पूर्ण करण्याच्या दृष्टीने आम्ही संमेलना कडे बघत आहोत.**

**रोहा थांबा**

रायगड जिल्ह्यातील रोहा रेल्वे स्थानकावर जलद आणि अतिजलद गाड्यांना थांबा दिला जावा ही रोहेकरांची मागणी आता पूर्ण झाली आहे. दहा जलद आणि अतिजलद गाड्यांना रोहा स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. मंत्री अदिती तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते काल याचा शुभारंभ करण्यात आला. यापुढे राहा स्थानकावर कोचुवेली इंदोर एक्स्प्रेस, कोयंबटुर हिसार एक्स्प्रेस, कोचुवेली चंढीगड एक्स्प्रेस, दादर तिरुनेलवेली एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस मडगांव एक्स्प्रेस यासह दहा गाड्या थांबणार आहेत.

**नंदुरबार-प्रबोधन**

नंदुरबारमध्ये दंगली होऊ नयेत म्हणून पोलीसदल आता पुढे सरसावले आहे. जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या संकल्पनेतून विविध सामाजिक संघटनांच्या मदतीनं आयोजित मुहल्ला बैठकीमधून युवकांच्याप्रबोधनाची मोहीम जिल्हा पोलीस अधिक्षकांनी हाती घेतली आहे.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेतील दुसऱ्या सामन्यात काल चेन्नई इथं भारतानं इंग्लंडवर दोन गडी राखून रोमांचक विजय मिळवला आणि मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली. इंग्लंडनं प्रथम फलंदाजी करताना 9 बाद 165 धावा केल्या. भारतानं शेवटच्या षटकांपर्यंत आठ गडी गमावून हे लक्ष्य पार केलं.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**